**<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. १४/२०१३ मधील निशाणी क्र.१३ कडील अर्जावर आदेश.</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज अर्जदारातर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक ११/११/२०२२ रोजी पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन प्रस्तुत प्रकरणात पुरावा देण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास गैरअर्जदार क्र. १ व २ तर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, न्यायालयाने अर्जदाराला पुरावा सादर करण्यासाठी पुरेशी संधी दिली आहे व त्यानंतर पुरावा बंदचा आदेश पारीत केला आहे. अर्जदार प्रकरण लांबवीत आहे व त्यामुळे अर्ज नामंजूर करावा. गैरअर्जदार क्र. ३ तर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये तीव्र हरकत असल्याचे कथन केले आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी अर्जदाराच्या व गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदाराने त्यांचा पुरावा दाखल न केल्याने अर्जदाराचा पुरावा बंद करण्यात आल्याबाबत निशाणी क्र. ०१ वर दिनांक ११/११/२०२२ रोजी आदेश पारीत करण्यात आला आहे. माझ्या मते अर्जदाराला त्याचा पुरावा सादर करण्याची संधी देऊन प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र

आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. ०१ वर दिनांक ११/११/२०२२ रोजी अर्जदाराविरुध्द पारीत केलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन अर्जदाराला त्याचा पुरावा सादर करण्यास परवानगी देण्यात येते.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

(पां.लिं. घुले)

दिनांकः २४/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, दारव्हा.